मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 14 जानेवारी 2025 | पान- 1

# ‘बॅकफीड’ अभावी तेरा तास ‘बत्ती गूल’

## सकाळी साडेआठ वाजता खंडित झालेला विद्युत पुरवठा रात्री पावणेदहा वाजता सुरळीत

**पिंपरी | प्रतिनिधी**

इंद्रायणीनगरात रविवारी (ता. १२) विद्युत डीपीजवळ साचलेला कचरा जळाल्याने विद्युत केबल जळाली. मात्र, इंद्रायणीनगरातील विद्युत पुरवठा ‘बॅकफीड’ या पर्यायी व्यवस्थेने केल्याने केबल जळूनही येथील विद्युत पुरवठा सुरळीत होता. भोसरीतील चांदणी चौकाजवळील केबलही सोमवारी नादुरुस्त झाल्या होत्या. मात्र, येथे ‘बॅकफीड’ची सुविधा नसल्याने भोसरीतील काही भागात रविवारी सकाळी साडेआठ वाजता खंडित झालेला विद्युत पुरवठा रात्री पावणेदहा वाजता सुरळीत झाला. त्यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.



भोसरीतील इंद्रायणीनगरातील इंद्रायणी स्वीटजवळील विद्युत डीपीजवळील कचरा काहींनी जाळल्याने त्याखाली असणाऱ्या विद्युत केबलही जळाल्या. त्यामुळे महावितरण विभागाला या केबलची दुरुस्ती करावी लागली. रविवारी सायंकाळपर्यंत हे काम सुरू होते. मात्र, या ठिकाणी बॅकफीडची व्यवस्था असल्याने केबल दुरुस्तीचे काम सुरू असतानाही इंद्रायणीनगरमधील विद्युत पुरवठा सुरळीत होता. भोसरीतील चांदणी चौकातही रविवारी (ता. १२) गटारातून गेलेल्या विद्युत केबलमध्ये पाणी जाऊन त्या नादुरुस्त झाल्या. येथेही दुरुस्तीचे काम रात्री नऊपर्यंत सुरू होते. मात्र, येथे केबल नादुरुस्त झाल्यावर विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठीची पर्यायी व्यवस्था नसल्याने भोसरीतील आदिनाथनगर, गव्हाणेवस्ती, पीएमटी चौक, भोसरी गावठाण, डोळसवस्ती आदी भागातील विद्युत पुरवठा तब्बल तेरा तास खंडित राहिला.

### विद्युत डीपीजवळील कचऱ्याची समस्या

» भोसरीतील इंद्रायणीनगरातील महाराष्ट्र कॉलनी, राजवाड्यातील दत्तमंदिराजवळ, इमारत क्रमांक २६, ४५ आणि ५७ जवळील विद्युत डीपी, रोहित्राजवळ कचरा साचला आहे. हे विद्युत डीपी, रोहित्रे नागरी वस्तीत असल्याने विद्युत तारांमधील स्पार्कने ठिणगी पडून आग लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे येथील विद्युत, डीपी रोहित्राला संरक्षण जाळी अथवा भिंत बांधून कचरा साचू न देण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते गिरीश वाघमारे यांनी केली आहे. तर विद्युत रोहित्रावर वाढलेले वेल सुकल्याने ठिणगीने त्याही पेठ घेण्याची शक्यता असल्याने रोहित्रावर पसरलेल्या वेली काढण्याची मागणी ज्येष्ठ नागरिक शांताराम चोरघे यांनी केली आहे.

“ परिसरातील विद्युत डीपी, रोहित्रे यांच्याजवळ असलेला कचरा काढण्यासह वेलीही काढण्याची मोहीम महावितरणद्वारे हाती घेण्यात आली आहे. त्याचप्रमाणे त्यांना संरक्षक जाळी बसविण्याचे कामही सुरू आहे. भोसरीत बॅकफीड उभारण्याच्याही नियोजनाचा विचार करण्यात येत आहे.

- अतुल देवकर, कार्यकारी अभियंता, महावितरण, भोसरी विभाग.

---

# विश्वविक्रमी “इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन” च्या नोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद!

## पहिल्या चार दिवसांत 10 हजाराहून अधिक सायकलस्वारांचे ‘रजिस्ट्रेशन’ : विविध संघटनांचा सहभाग

**पिंपरी | प्रतिनिधी**

इंद्रायणी नदी स्वच्छता अन् संवर्धनाच्या जागृती करणे. पर्यावरण रक्षणाचा संदेश देणे आणि युवा पिढीमध्ये सायकलिंग व नियमित व्यायाम याबाबत जनजागृती करणे. या उद्देशाने आयोजित इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉनच्या नोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पहिल्या चार दिवसांतच तब्बल १० हजार २८६ हून अधिक पर्यावरण प्रेमींनी सायकल रॅलीसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन केले आहे.

श्रीक्षेत्र आळंदी आणि श्रीक्षेत्र देहू अशा तीर्थक्षेत्रांना जोडणारी इंद्रायणी नदीबाबत महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायमध्ये विषेश महत्त्व आहे. इंद्रायणीचे पाणी तीर्थ म्हणून वारकरी प्राषण करतात. मात्र, नदी प्रदूषणामुळे इंद्रायणीचे अस्थित्व धोक्यात आले आहे. अशा पवित्र इंद्रायणीला गतवैभव प्राप्त करुन देण्यासाठी आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून ‘ इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन’ ही मोहीम हाती घेण्यात आली. 2017 पासून प्रतिवर्षी ‘इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन’ आयोजित केली जाते. यंदा सायक्लोथॉचे 9 वे वर्ष आहे,




अशी माहिती मुख्य समन्वयक डॉ. निलेश लोंढे यांनी दिली आहे.

येत्या रविवारी, दि. 19 जानेवारी 2025 रोजी भोसरी येथील गावजत्रा मैदानावर सकाळी 6 वाजता विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये ही सायक्लोथॉन होणार आहे.

‘इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन’मध्ये पर्यावरण प्रेमी, सायकलपटू आणि सर्वसामान्य नागरिकांना सहज सहभागी होता यावे. या करिता आयोजकांनी HTTPS://RIVERCYCLOTHON.IN/ हे संकेतस्थळ निर्माण केले आहे. याद्वारे ऑनलाईन पद्धतीने नागरिकांनी सायक्लोथॉनसाठी नोंदणी करता येते. विशेष म्हणजे, सायक्लोथॉनमध्ये सहभागी होण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. संकेतस्थळ समाजमाध्यमांध्ये व्हायरल करण्यात आले. सोमवारी सायंकाळी 5 वाजेपर्यंत 10 हजार 286 नागरिकांनी यावर नोंदणी केली आहे.

### गिनिज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचा मान...

» गतवर्षी रिव्हर सायक्लोथॉनची 2022 मध्ये ‘इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड’ मध्ये नोंद झाली आहे. 'सायकलची सर्वात मोठी रांग' (‘Longest line of bicycles (static)’) हे रेकॉर्ड, गिनीस वर्ल्ड रेकॉर्डस् मध्ये नोंदवण्यात आले होते.

# महापालिका करणार 11 हजार विद्यार्थ्यांना सहाय्य

## संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात लवकरच रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या वतीने इयत्ता दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक अर्थसाह्य योजनेसाठी आतापर्यंत १३ हजार ६३८ अर्ज आले असून, छाननीमध्ये ११ हजार विद्यार्थ्यांचे अर्ज पात्र ठरले आहेत. संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात लवकरच रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार आहे. या योजनेसाठी अर्ज करण्यासाठी ३१ जानेवारीपर्यंत मुदत आहे.



महापालिकेच्या हद्दीत राहणाऱ्या आणि इयत्ता दहावी-बारावीच्या परीक्षेत गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेण्यासाठी महापालिकेच्या वतीने शैक्षणिक अर्थसाह्य योजना राबविली जाते. दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मौलाना अबुल कलाम आझाद शैक्षणिक योजनेंतर्गत १५ हजार रुपयांची मदत दिली जाते. या योजनेसाठी महापालिकेच्या समाजकल्याण विभागाकडे आतापर्यंत १० हजार १४७ अर्ज आले आहेत.

यातील दोन हजार अर्ज अपात्र ठरले असून, आठ हजार अर्ज पात्र ठरले आहेत. बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे योजनेच्या माध्यमातून २५ हजार रुपयांची मदत दिली जाते. यासाठी ३ हजार ४९१ अर्ज आले आहेत. त्यांपैकी ६४७ अर्ज अपात्र ठरले असून, २८४४ अर्ज पात्र ठरले आहेत. या योजनेसाठी महापालिकेच्या २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात १७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर या योजनांची मुदत वाढविण्यात आली आहे.

महापालिकेचे समाजकल्याण विभागाचे उपायुक्त नितीन उदास म्हणाले, या दोन्ही योजनांचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करावा लागतो. आवश्यक ती कागदपत्रे न दिल्यास किंवा योजनेचा फायदा घेण्यासाठी आवश्यक असलेले गुण नसल्यास संबंधित अर्ज अपात्र ठरविले जातात.

### काय आहेत योजनेसाठी नियम...

» विद्यार्थ्याला शैक्षणिक वर्षात दहावी किंवा बारावीमध्ये कमीत कमी ८० टक्के गुण असले पाहिजेत.
» पुणे महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थी असल्यास किंवा रात्रशाळेतील विद्यार्थी असल्यास किंवा मागासवर्गीय विद्यार्थी असल्यास त्याला किमान ७० टक्के गुण असावेत.
» योजनेचा लाभ घेणारा विद्यार्थी ४० टक्के अपंग असेल, तर त्याला दहावी किंवा बारावीमध्ये किमान ६५ टक्के गुण असावेत.
» योजनेचा लाभ घेणाऱ्याने पुढील शिक्षणासाठी मान्यताप्राप्त संस्थेत प्रवेश घेतलेला असावा.

# ‘ग्लोबल एंटरप्रेन्युअर्स कॉन्क्लेव्ह’ चे व्यासपीठ मराठी उद्योजकतेला चालना देणारे

## नितीन गडकरी यांचे प्रतिपादन : पीसीईटी, पीसीयू, गर्जे मराठी ग्लोबल, एमईडीसीच्या परिषदेचे उद्घाटन

**पिंपरी | प्रतिनिधी**

अमेरिकेसारख्या विकसित राष्ट्रांमध्ये मराठी उद्योजक मोठ्या पदांवर जबाबदारी सांभाळत आहेत. महाराष्ट्रात नैसर्गिक साधन संपत्ती मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. महाराष्ट्र बरोबरच देशभर उद्योग, व्यवसाय आणि रोजगाराला चालना देण्यासाठी सरकारी संस्था, शैक्षणिक संस्था आणि उद्योजक यांच्यामध्ये योग्य समन्वय, संपर्क होणे आवश्यक आहे. त्यासाठी पीसीईटी, पीसीयू, गर्जे मराठी ग्लोबल आणि एमईडीसी यांनी स्थापन केलेले ‘ग्लोबल एंटरप्रेन्युअर्स कॉन्क्लेव्ह २०२५’ हे व्यासपीठ मार्गदर्शक ठरेल. या व्यासपीठामुळे महाराष्ट्र सह जगभरातील मराठी उद्योजकतेला चालना मिळेल असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचलित पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयु), गर्जे मराठी ग्लोबल, महाराष्ट्र इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने, बालेवाडी येथे ‘ग्लोबल एंटरप्रेन्युअर्स कॉन्क्लेव्ह २०२५’ चे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन नितीन गडकरी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत, माजी मंत्री व पीसीयूचे कुलगुरू हर्षवर्धन पाटील, जीआरएचे अध्यक्ष आणि नॅशनल इनोव्हेशन फाऊंडेशन, इंडियाचे अध्यक्ष डॉ. रघुनाथ माशेलकर, स्ट्रॅटेजिक फोरसाइट ग्रुपचे अध्यक्ष आणि ए वर्ल्ड विदाऊट वॉरचे लेखक संदीप वासलेकर, डॉ. समीर मित्रगोत्री, हार्वर्ड विद्यापीठाचे प्रा. डॉ. नील फिलिप, ब्रॉन्क्स कम्युनिटी कॉलेज न्यूयॉर्कच्या सिटी युनिव्हर्सिटीचे प्रा. डॉ. मुकुंद कर्वे, रटगर्स विद्यापीठ यूएसएचे प्रा. आणि डॉ. शैलेंद्र देवळाणकर, पीसीईटीच्या उपाध्यक्ष पद्माताई भोसले खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई तसेच महाराष्ट्र शासनाचे उच्च शिक्षण संचालक, उद्योग मंत्रालयाचे उच्चपदस्थ अधिकारी, देश, परदेशातून आलेले मराठी उद्योजक उपस्थित होते.

उद्योग मंत्री उदय सामंत उद्घाटन सत्रात मार्गदर्शन करताना म्हणाले की, महाराष्ट्र बरोबरच देश परदेशातील मराठी उद्योजकांना उद्योग व्यवसाय मध्ये मदत होण्यासाठी महाराष्ट्र उद्योग मंत्रालयाच्या वतीने एक स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात येणार आहे.

### रामदास काकडे यांच्यासह मान्यवरांचा सन्मान..

» यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते उद्योजक रामदास काकडे, डॉ. पी. डी. पाटील आणि सुरेश पुराणिक यांना जीवनगौरव तसेच आशिष आचलेकर, अमित गर्ग, डॉ. एस. व्ही. आंचन, रमेश रासकर, महेश भागवत, विलास शिंदे यांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालयात मराठी भाषेत अभियांत्रिकीचे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. याचा आगामी काळात मराठी अभियंते मोठ्या प्रमाणात घडण्यास उपयोग होईल.

माजी मंत्री व पीसीयूचे कुलगुरू हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले की, शैक्षणिक संस्था व विविध उद्योग यांच्यातील यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी हे व्यासपीठ सुरू करण्यात आले आहे. यामध्ये उद्योजक, विद्यार्थी व उद्योग विभागाचे धोरण ठरवणारे अधिकारी यांना एकत्र आणून यावर मार्ग काढण्याचा प्रयत्न पीसीयूच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

या परिषदेसाठी शंभर पेक्षा जास्त एनआरआय मराठी उद्योजक, वक्ते, संशोधक, शास्त्रज्ञ, १२० स्टार्टअपचे नवउद्योजक, गुंतवणूकदार अशा बाराशे पेक्षा जास्त व्यक्तींनी सहभाग घेतला होता.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्वागत सचिन ईटकर, आभार आनंद गानु यांनी मानले.

# नागरिकांची कामे विहित मुदतीत करा

## पालिका आयुक्तांच्या सर्व विभागप्रमुखांना सूचना : शंभर दिवसांचा कार्यक्रम जाहीर

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पारदर्शक, उत्तरदायी असलेले लोकाभिमूख गतिमान प्रशासन, तसेच नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी १०० दिवसांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. राज्य सरकारच्या निर्देशानुसार या कार्यक्रमाची अंमलबजावणी पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून करण्यात आली आहे. यामध्ये नागरिकांची कामे मुदतीत पूर्ण करणे, जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन करणे, तक्रार निवारण आणि परस्पर संवाद वाढवण्यावर भर देण्याचे निर्देश महापालिका प्रशासनातील सर्व विभागप्रमुखांना देण्यात आले आहेत.

राज्य सरकारने दिलेल्या निर्देशाप्रमाणे महापालिका प्रशासनाने हा कार्यक्रम निश्चित केला आहे. त्या प्रमाणे अंमलबजावणी करण्याचे परिपत्रक पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी निर्गमित केले आहे. यामध्ये नागरी सुविधांच्या बाबतीत कार्यालयीन कामकाज कमीत कमी वेळेत पूर्ण करण्यात यावे. अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या भेटीसाठी निश्चित वेळ ठरवून द्यावी. नागरिकांच्या तक्रारींचे जलद निवारण करावे. तसेच, महापालिका क्षेत्रात उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या उद्योजकांना सर्वतोपरी सहकार्य करावे. त्यांच्यासाठी आखण्यात आलेल्या धोरणांची अंमलबजावणी करावी. केंद्र व राज्यस्तरीय योजनांची अंमलबजावणी करावी. महापालिकेचे संकेतस्थळ अद्ययावत करण्यात यावे.



सर्वसामान्यपणे उपलब्ध असलेली जी माहिती नागरिक माहिती अधिकाराचा वापर करून विचारतात. ती माहिती विभागांनी पारदर्शकपणे संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावी. जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन कराव्यात. यासह सायबर सुरक्षेबाबत नागरिकांना हमी द्यावी. सार्वजनिक वाहतूक सुविधा सक्षमीकरण करावी. बस, रेल्वे, मेट्रो सेवांची वारंवारिता व नेटवर्क सुधारावे. यासह तक्रार निवारण दिन, लोकशाही दिन, अधिकारी व नागरिक यांच्या संवाद, एक खिडकी उपक्रम राबवावा. यासह महापालिका कर्मचा-यांसाठी 'तक्रार निवारण दिन' घेण्यात यावा. महापालिका मुख्यालयासह सर्व कार्यालयांमध्ये सर्वकष स्वच्छता मोहीम राबवून अनावश्यक गोष्टी काढून टाकाव्यात. शहरात सौंदर्यीकरण करावे, असे निर्देश या आदेशात आयुक्त सिंह दिले आहेत.

### शिक्षण व आरोग्य सुविधांवर भर

» या १०० दिवसीय कार्यक्रमाअंतर्गत महापालिकेकडून शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, अंगणवाड्यांची तपासणी करून पुरवल्या जाणाऱ्या शिक्षण व आरोग्यविषयक सुविधांची पाहणी करावी. शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता, शिक्षणाची गुणवत्ता, शालेय सुविधा तपासावी, तर आरोग्य केंद्रात डॉक्टरची उपलब्धता, औषधांची गरज, अंगणवाडीतील बालकांचे पोषण, शिक्षण आणि आरोग्याचा आढावा घेतला जावा, असे निर्देश या आदेशात आयुक्त सिंह यांनी दिले आहेत.

# चिखली, कुदळवाडीतील भंगार, गोदामे, पत्राशेडवर कारवाई

## तब्बल 1 हजार 700 भंगार, गोदामे, पत्राशेडवर कारवाई : अनधिकृत गोदामांवर होणार कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली, कुदळवाडी परिसरातील विकास आराखड्यातील रस्त्यावर असलेली अतिक्रमण, अनधिकृत गोदामे, अग्निशामक सुविधा उपलब्ध न केलेली तब्बल १७०० भंगार दुकाने जमीनदोस्त करण्यात येणार आहेत. त्यामुळे कुदळवाडी, चिखली भागात संबंधित दुकानदारांना नोटीस वाटप सुरू करण्यात आले आहे.

शहरात अस्वच्छता वाढून वायू, ध्वनी आणि जलप्रदूषणात भर पडत आहे. तसेच, भंगार गोदामांना आग लागण्याच्या घटनाही आश्चर्यकारक आणि दररोजच्या झाल्या आहेत. या भंगार गोदामांकडून शहरास धोका निर्माण होऊ लागल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. पिंपरी-चिंचवड शहरातील चिखली, मोशी, कुदळवाडी परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरीकरण होत आहे. त्यामुळे अनधिकृत भंगार दुकानात वारंवार लागणाऱ्या आगीमुळे रहिवासी असणाऱ्या नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. धुरांचे लोट, प्रदूषणामुळे लोकवस्ती असलेल्या भागात पसरत असतो. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असतो. अनधिकृत भंगार दुकाने आणि गोदामांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परंतु, महापालिकेने अग्निशामक सुरक्षा यंत्रणेच्या दृष्टीने ना हरकत प्रमाण घेण्याकडे दुकानदार दुर्लक्ष करत आहेत. तेथील भंगार दुकाने, गोदामे, पत्राशेड यांच्यामुळे बेशिस्तपणा वाढला आहे.

शहराच्या उपनगरीय भागातील चिखली, कुदळवाडी, मोशी, पिंपरी, दापोडी, सांगवी, पिंपळे गुरव, कासारवाडी, भोसरी, आकुर्डी, चिंचवड, चिंचवड स्टेशन, थेरगाव, रहाटणी, काळेवाडी, रावेत, पुनावळे, एमआयडीसी आदी भागातील भंगार



दुकाने आणि गोदामांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. नदीकाठी तसेच, नाल्यांच्या बाजूने ही दुकाने थाटली गेली आहेत. मोठमोठे पत्राशेड टाकून बिनधास्तपणे भंगार खरेदी-विक्रीचा व्यवसाय सुरू आहे. त्यापैकी बहुतांश गोदामे भरलोकवस्तीत आहेत. कोणताही व्यवसाय व उद्योग परवाना न घेता, भंगार दुकाने व गोदामे उभारली जात आहेत. भरमसाट भाडे मिळत असल्याने जागामालक, त्यांच्या जागा भाड्याने देऊन मोकळे होतात. भंगारातून निघालेले कागदाचे तुकडे, थर्माकोल, द्रव्य, रासायनिक सांडपाणी आदी अनावश्यक कचरा थेट नदी नाल्यात फेकून दिला जातो. काही कचरा थेट जाळला जात असल्याने विषारी व दुर्गंधीयुक्त वायू तयार होत आहे. त्यामुळे परिसरातील रहिवाशांना श्वसनाचे त्रास होत आहेत. वायू व जलप्रदूषणात भर पडत आहे. या संदर्भात अनेक हाऊसिंग सोसायट्यांनी महापालिकेकडे अनेकदा तक्रारी केल्या आहेत.

### वारंवार आगीच्या घटना... वित्तीय हानी

» नदीकाठ, नाले तसेच, लोकवस्तीत भंगार दुकाने व गोदाम उभी राहात असल्याने ती आगीचे आगार झाले आहेत. अनेक गोदामांत अग्निसुरक्षा यंत्रणा वापरली जात नाही. त्यात आगीचे प्रकार सातत्याने घडत आहेत. कुदळवाडी, चिखली व मोशी येथील भंगार गोदामांना आग लागल्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. आग इतकी प्रचंड असते की, तीन दिवस ती आग आटोक्यात येत नाही. हे प्रकार रोखण्याबाबत महापालिका प्रशासन गंभीर नसल्याचे दिसून येत आहे. या आगीत जीवितहानी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गोदामांना आळा घालण्याची गरज असून, त्यासाठी शहराच्या एका भागात स्वतंत्र क्लस्टर बनवण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यावर महापालिकेचे नियंत्रण व देखरेख असणे आवश्यक आहे.

मात्र, प्रशासन कारवाई न करता बघ्याच्या भूमिकेत असल्याचे स्पष्ट होते. प्रक्रिया न करता रासायनिक सांडपाणी नाल्यात सोडल्याने महापालिकेने दोन ते तीन भंगार गोदामांवर कारवाईही केली आहे. मात्र, हे प्रमाण अल्प आहे.

दरम्यान, महापालिकेने चिखली, कुदळवाडी परिसरातील भंगार दुकाने, गोदामे यांच्यावर कडक कारवाई करण्यात येणार आहे. याकरिता अग्निशामक विभाग आणि क्षेत्रीय कार्यालयाकडून कारवाईचे नियोजन केले आहे. त्या भागातील सुमारे १ हजार ७०० भंगार दुकाने, गोदामे, पत्राशेडवर कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# रेल्वे मार्ग बदल्यास लढा उभा करणार

## खासदार डॉ. अमोल कोल्हे : जीएमआरटी विकासाच्या मार्गातील अडथळा?

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यातील जीएमआरटीमुळे शेतकऱ्यांच्या विकासाची जीवनदायीनी असलेल्या रेल्वे मार्गात बदल करणार असाल तर आपल्याला मोठा लढा उभा करून संघर्ष करावा लागेल असे शिरूर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ.अमोल कोल्हे यांनी म्हटले आहे. नारायणगाव येथील ग्लोबल कृषी महोत्सवाच्या समारोपा प्रसंगी डॉ. कोल्हे बोलत होते. ते म्हणाले की, जीएमआरटी जुन्नर तालुक्यात 30 वर्षांपूर्वी (1996मध्ये) आली असून मागील तीस वर्षांत शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञान आले तर जीएमआरटीमध्ये काही तंत्रज्ञान बदलले की नाही असा प्रश्न निर्माण होतो.



शेतमालासाठी कृषी विज्ञान केंद्र शेतकऱ्याला विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विकासाच्या मार्गावर घेऊन जाण्यासाठी प्रयत्नशील आहे. मग शेतकऱ्यांनी पिकवलेल्या उत्पादित मालाचे करायचे काय? आम्हाला बाजारपेठ निर्माण होण्यासाठी वाहतुकीचे मार्ग उपलब्ध झाले पाहिजे.शेतकऱ्यांनी पिकवलेल्या शेतमालाला 60 टक्के वाहतूक खर्च होत असेल तर शेतकऱ्याच्या पदरात पडते काय. शेतमालाच्या जलवाहतूक मार्गासाठी एक टक्के, रेल्वे मार्गासाठी तीन टक्के तर रस्ते मार्गासाठी नऊ टक्के खर्च येतो. पुणे नाशिक रेल्वे मार्ग निर्माण झाला तर शेतकऱ्याच्या खर्चात बचत होऊन उत्पादन वाढेल आणि उत्तर व दक्षिण भारतातील बाजारपेठ उपलब्ध होईल. तंत्रज्ञानाच्या क्रांतीची फळे पुढच्या पिढीला मिळविण्यासाठी आपण लढा उभा केला नाही तर हाता तोंडाशी आलेला घास निष्ठून जाईल याची प्रत्येकाने जाणीव ठेवली पाहिजे.

यामध्ये कुठलाही स्वार्थ नसून पुणे-नाशिक ब्रॉडगेज रेल्वे मार्ग आहे. त्यामुळे पुणे नाशिक रेल्वे मार्ग नुसता प्रवासी वाहतुकीसाठी नसून रात्री अकरानंतर मोठ्या प्रमाणात मालवाहतुकीसह इतर वाहतूक होणार आहे. त्याचा फायदा शेतकऱ्यांनी पिकवलेला शेतमालाला देशाभरातील बाजारपेठा उपलब्ध होणार अल्याचे त्यांनी नमूद केले.

### जीएमआरटी इम्पोर्टसाठी काही सुविधा देणार का?

जीएमआरटीच्या माध्यमातून 23 देशाचे शास्त्रज्ञ देशांचा अभ्यास करतात त्यामुळे पुणे-नाशिक रेल्वे मार्ग बदलावा लागेल, असे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दोन दिवसांपूर्वी म्हणाले होते. यावर डॉ. कोल्हे म्हणाले की, जर रेल्वे मार्ग बदलला तर कृषी क्षेत्रातील तज्ञांनी सांगावे की आमचा शेतमाल उत्तर व दक्षिण भारताच्या बाजारपेठेत पोहोचण्यासाठी 23 देशांतील शास्त्रज्ञ जीएमआरटीच्या माध्यमातून शेतमालाच्या इम्पोर्टसाठी काही सुविधा देणार आहेत का? शेतकऱ्यांच्या विकासासाठी काही योजना आणली आहे का?

### जीएमआरटी, रेल्वे राहिली पाहिजेच

» जीएमआरटी अभिमानास्पद असली तरी शास्त्रज्ञाने तोडगा काढून जीएमआरटी व रेल्वे राहिली पाहिजे, असा प्रयत्न केला पाहिजे. रेल्वेच्या मूळ डीपीआरमध्ये मी जाणीवपूर्वक भांडून आळेफाटा, नारायणगाव, मंचर येथे ॲग्रीकल्चर रॅक मागून घेतल्या होत्या. आमच्याच तालुक्याच्या आवारात तुम्ही आहात. आणि तुमच्यामुळे आमच्या विकासाच्या संधी खुंटत असतील तर आम्हाला प्रश्न विचारावे लागतील. कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून विज्ञान आणि तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या घरापर्यंत पोहोचत असल्याचे डॉ. कोल्हे यांनी सांगितले.

# धान्य उत्पादक वळला आता भाजीपाला लागवडीकडे

## पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यात इतर पिकाला शेतकऱ्यांनी शोधला पर्याय

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील इंदापूर हा बागायती तालुका म्हणून नावारूपाला आला आहे. कमी पाण्यात आदर्श शेती फुलवण्याची किमया बळीराजा करतो आहे. उसाची शेती, फळबागा यामध्ये इंदापूरचा शेतकरी आपला अव्वल दर्जा जिल्ह्यात नाही तर राज्यात टिकवून आहे. ज्वारी, बाजरी, मका या पिकापेक्षाही अधिक धान्य उत्पादक शेतकरी आता, भाजीपाला लागवडीकडे वळाल्याचे चित्र निर्माण झाले आहे.



इंदापूर तालुक्यात उसाची शेती करणारा मोठा शेतकरी आहे; मात्र वर्षभर कष्ट घ्यायचे, ऊस पिकवाचा आणि या उसाला हमीभाव नसल्यामुळे वर्षभर केलेले कष्ट, घेतलेली मेहनत, केलेला खर्च हातात राहत नाही. त्यामुळे खऱ्या अर्थाने ऊस उत्पादक शेतकरी पिक बदलाची पद्धत लक्षात घेऊ लागला आहे. तीन सहकारी साखर कारखाने उसाचे गाळप इंदापूर तालुक्यामध्ये करत असतात; मात्र प्रत्येक वेळी प्रत्येक सीझनला शेतकऱ्यांना दरासंदर्भात मोठी आर्थिक हानी सोसावीच लागते. त्यातच धान्य पिकवले तर त्याही धान्याला हमीभाव नाही. त्यामुळे इंदापूर तालुक्यात धान्य कोठार असला तरी धान्यशेती करणारा शेतकरी आजही पाहिजे तसा समृद्ध झालेला नाही.

शेतकऱ्याला समृद्ध करण्यासाठी त्याला विविध पिकांची लागवड करावी लागणार आहे. यासाठीच कृषी विभागाकडून नवनवे प्रयोग केले जात आहेत. यामुळेच तालुक्यातील निमगाव केतकी, वरकुटे, काटी, बॅकवॉटर पट्टा तसेच नीरा नरसिंहपूर परिसर आता भाजीपाला पिकवणारा परिसर म्हणून पुढे आलेला आहे.

### ताजा माल, ताजा पैसा

» निमगाव केतकी, काटी परिसरातील भाजीपाला पुण्यासारख्या मोठ्या बाजारपेठेत आपला करिष्मा करून राहिला आहे. रोज शेतकरी आपल्या शेतातील ताजा भाजीपाला, पुणे, मुंबई येथे पाठवून ताजा पैसा निर्माण करत आहेत. ढोबळी मिरची, वांगी, कारले गवार, कांदा, मेथी व इतर पालेभाज्या इंदापूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात शेतकरी घेत आहेत. भाजीपाला हा कमी दिवसात शेतामध्ये पिकतो, त्यामुळे त्याला लगेचच बाजारात मागणी असल्यामुळे, आर्थिक चलन शेतकऱ्यांचे चालू राहते. त्यामुळे जिल्ह्यात व राज्यात इतरत्र भाजीपाला महाग झाला तरी देखील, इंदापूर तालुक्यातील नागरिकांना मात्र स्वस्तात भाजीपाला उपलब्ध होत आहे.

> यंदा रब्बीत जिल्ह्यात तब्बल शेकडो हेक्टर क्षेत्रात शेतकऱ्यांनी भाजीपाला लागवड केली आहे. जिल्ह्यात धान पीक प्रामुख्याने घेतले जात असून, भाजीपाला लागवड शेतकरी आपल्यापुरतीच न करता, आपल्या शेतीत भाजीपाला पिकून आपले आर्थिक उत्पन्न कसे वाढवता येईल याकडे लक्ष देत आहे. याच भाजीपाला उत्पन्नामुळे, तालुक्यातील शेतकऱ्यांना बारमाही उत्पन्न भाजीपाला शेती मिळवून देत आहे.
>
> - साहेबराव मोहिते, प्रगतशील शेतकरी.